महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विलंबाने अदा करण्यात येणाऱ्या मजुरीवर नुकसानभरपाई (विलंब आकार) देण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः मगांराग्रारोहयो-२०१४/प्र.क्र.१०/रोहयो-६ब**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ जुलै , २०१४

**वाचा -**

१) ग्राम विकास विभाग, केंद्र शासन, नवी दिल्ली यांची अधिसूचना (Notification), दि. ३ जानेवारी, २०१४

२) शासन परिपत्रक क्रमांकः मग्रारो-२०१४/प्र.क्र.५/पुर्नबां.७/२०१०/रोहयो-१०अ, दि. २० जानेवारी, २०१४.

३) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः मगांराग्रारोहयो-२०१४/प्र.क्र.१०/रोहयो-६ब, दि. २६ फेब्रुवारी, २०१४.

**परिपत्रक :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हजेरीपत्रक बंद झाल्यानंतर १५ दिवसांत मजुरी अदा करण्यात आली नाही तर मजुरीच्या प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी हजेरीपत्रक बंद झाल्यानंतर १६ व्या दिवसापासून प्रतिदिवस देय मजुरीवर ०.०५% नुकसानभरपाई देण्याचा निर्णय दि. २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यपध्दती नवीन असल्यामुळे दि. ३१/७/२०१४ पर्यंत विलंबाची रक्कम अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार शासनातर्फे सोसला जाणार असल्याचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले होते व तदनंतर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून सदर रक्कम वसुल करण्यात येणार होती. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विलंबाने अदा करण्यात येणाऱ्या मजुरीवर

नुकसानभरपाई देण्याच्या प्रक्रियेच्या प्रगतीचे अवलोकन केले असता राज्यस्तरावर विलंबाने मजुरी अदा होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. हे सर्व E-FMS प्रणाली, एक काम दोन मोजमाप पुस्तिका, मुबलक कंत्राटी कर्मचारी वर्ग, चांगले पर्यवेक्षण इत्यादीमुळे शक्य झाले आहे.

तथापि, राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही ठिकाणी मजुरीचे प्रदान १५ दिवसांत न होता तीन ते चार महिने इतक्या कालावधीच्या विलंबाने होत असल्याचे आढळून आले आहे. या सर्व प्रक्रियेचे पुन:र्विलोकन केले असता १५ दिवसांच्या आत मजुरीचे प्रदान करण्यासाठीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणखी कालावधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रक्रिये संदर्भात खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत:-

अ) संदर्भाधीन दि. २६ फेब्रुवारी, २०१४ **रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या अंतिम दिनांकास या परिपत्रकाअन्वये मुदतवाढ देण्यात येत असून आता दि. ३१/७/२०१४ ऐवजी दि. ३१ /१२/२०१४ पर्यंत विलंबाची रक्कम अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार राज्य शासन सोसेल**. दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून विलंबाची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून वसुल करण्यात येईल.

**ब) सद्यस्थितीत प्रलंबित असलेल्या हजेरीपत्राबाबत सुचना:-**

संदर्भीय शासन निर्णय अस्तित्वात आल्यानंतर दि. २८ जुलै, २०१४ रोजी पर्यंत नरेगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत:-

१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या मजुरी प्रदानापैकी <u>फक्त २१ % मजुरीचे प्रदान</u> हजेरीपत्रक बंद झाल्यापासून १५ दिवसांच्या आत झाले आहे.

२) माहे एप्रिल-२०१४ मधील ५५०० हजेरीपत्रके, माहे मे, २०१४ मधील १७३१९ व जून, २०१४ मधील ३२१४८ हजेरीपत्रकांच्या बाबतीत मजुरीचे प्रदान अद्यापही प्रलंबित आहे.

३) देय विलंब मजुरी प्रदानापैकी फक्त २५% रक्कम मजुरांना अदा झाली आहे.

४) तसेच, बदली, रजा किंवा इतर कारणामुळे अधिकारी उपलब्ध नसल्यास, पर्यायी डिजिटल स्वाक्षरीच्या वापराबाबत विस्तृत सूचना वेळोवेळी देऊनसुद्धा याबाबत योग्य मार्गदर्शन जिल्हा स्तरावरून तालुकास्तरावर केले जात नाही.

या विलंबास प्रामुख्याने क्षेत्रीय स्तरावरील संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना **माहे एप्रिल-२०१४, मे-२०१४ व जून-२०१४ या महिन्यांतील प्रलंबित हजेरीपत्रकांच्या देयकांचे प्रदान करण्याची अंतिम मुदत दि. २० ऑगस्ट, २०१४ पर्यंत राहील.** या मुदतीपूर्वी प्रलंबित देयकांचे प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त मुदतीनंतरसुध्दा माहे एप्रिल/मे/जून,२०१४ ची देयके प्रलंबित राहिल्यास शासनामार्फत देय विलंब शुल्कापैकी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विलंबास जबाबदार ठरणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून सदर रक्कम वसुल करण्यात येईल. ही वसुली करण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| **विलंबास जबाबदार अधिकारी / कर्मचारी** | **वसुलीची कमाल रक्कम (प्रती माह)** |
|---|---|
| ग्राम रोजगार सेवक | रु. १०० |
| तांत्रीक अधिकारी | रु. २५० |
| डेटा एण्ट्री ऑपरेटर | रु. २०० |
| सहायक लेखाधिकारी/ अव्वल कारकून/ लिपिक | रु. २५० |
| कार्यक्रम अधिकारी/ सह- कार्यक्रम अधिकारी | रु. ५०० |

(उदा- जर एका तालुक्यात एप्रिल-२०१४ ची २० हजेरीपत्रके दि.२० ऑगस्ट, २०१४ पर्यंत अदा झाली नाहीत व विलंबाची जबाबदारी तांत्रीक अधिकारीवर निश्चित झाल्यास, विलंब नुकसानभरपाई रक्कम- रु. २५० असल्यास, रु. २०० संबंधित तांत्रिक अधिकाऱ्याकडुन वसूल करण्यात येईल व रु. ५० शासन सोसेल. वरील मर्यादा व्यक्ती निहाय राहील.)

तसेच, भविष्यात दि. १ जुलै, २०१४ पासून जर अनुज्ञेय १५ दिवसांच्या मुदतीनंतर ३० दिवस मजुरी प्रलंबित असेल तर जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून ०.०५% विलंब आकार वसुल करु शकतात. परंतु, सदर विलंब आकार उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या रकमेच्या मर्यादेत असावा.

उपरोक्तप्रमाणे वसुली करताना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विश्लेषणात्मक स्वयंस्पष्ट आदेश (speaking orders) काढावेत.

**क) मजुरी मुदतीत प्रदान न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द गंभीर नियमभंग. प्रकरणासंबंधी कार्यवाही :-**

खाली नमूद केलेली प्रकरणे गंभीर नियमभंग म्हणून समजली जातील:-

१. मजुरी प्रदानास १ महिना व त्यापेक्षा अधिक कालावधीचा विलंब.

२. गट विकास अधिकारी/तहसिलदार यांचेकडून विलंब आकाराचे प्रदान न होणे.

३. कार्यक्रम अधिकारी/सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडून ३० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी मजुरी प्रदानासाठी विलंब होणे, विलंबाने प्रदान होणाऱ्या मजुरीबाबत योग्य नियंत्रण न ठेवणे अथवा उचित पर्यवेक्षण न करणे, गट स्तरावर मजूरी प्रदानाच्या प्रक्रियेमध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांची पर्यायी व्यवस्था करण्यासंबंधी बाबी योग्यरितीने न हाताळणे.

अशा प्रकरणात संबंधित जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांनी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) व सह कार्यक्रम अधिकारी (गट विकास अधिकारी) यांच्यावर महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा १९७७ मधील अनुसूची २, नियम क्र.३१ नुसार (रु. १००० पर्यंत) दंडात्मक कार्यवाही करावी. सदर कार्यवाही करताना विश्लेषणात्मक स्वयंस्पष्ट आदेश (speaking orders) काढण्यात यावेत.

ड. आयुक्त, नरेगा यांनी क्षेत्रीय अधिका-यांचा अभ्यास गट स्थापन करून मजुरीच्या प्रदानात होणारा विलंब आणखी कमी करणेबाबत शासनाला दि. ३० ऑगस्ट, २०१४ रोजीपर्यंत शिफारशी सादर कराव्या. तसेच, मजुरी प्रदानातील विलंब कमी करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन/ प्रशिक्षण जिल्हास्तरावर द्यावे व त्याचे विश्लेषण करुन कुठले कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी मजुरी वितरणास विलंब करीत आहेत याबाबत शासनाला अवगत करावे. त्यानंतर शासन संबंधित जिल्हयाच्या जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना कार्यवाही करणेबाबत आदेशित करेल.

इ. विलंबाची रक्कम अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार राज्य शासनामार्फत सोसण्याच्या दिनांकास या परिपत्रका अन्वये मुदतवाढ देण्यात आली असली तरी मजूरांना मजुरी १५ दिवसांच्या आत अदा करणे नियमाप्रमाणे बंधनकारक आहे व ही जबाबदारी त्यांना टाळता येणार नाही याची नोंद घ्यावी. दिनांक १ ऑगस्ट, २०१४ ते

३१ डिसेंबर, २०१४ हा कालावधी मजुरी प्रदानाच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठी उपयोगात आणावा. जेणेकरुन, भविष्यामध्ये दि. १ जानेवारी, २०१५ पासून १५ दिवसांतच मजुरी प्रदान करणे शक्य होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग.
31/7/2014

प्रत,

१. मा. प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्विय सहाय्यक.

२. आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

३. आयुक्त (मगांराग्रारोहयो), आयुक्त कार्यालय, नागपूर.

४. जिल्हाधिकारी (सर्व) (बृहन्मुंबई वगळून)

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

६. उप सचिव (रोहयो) यांचे स्विय सहाय्यक.

७. उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

८. उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

९. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व)

१०.निवडनस्ती.